सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

महत्वाचे / तात्काळ

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/गु. या./२०११/ 3026

दिनांक :- 20/12/2009

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित,
अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था.
सर्व अल्पमुदत अभ्यासक्रम चालविणाऱ्या (Non-AICTE) संस्था.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका तसेच अल्पमुदत (Non-AICTE) अभ्यासक्रमाच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या तपासणीबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/थेट गु.या./२०११/२०९१ दिनांक २९/८/२०११.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/गु.या./२०११/२४८७ दिनांक १८/१०/२०११.
३) शासन निर्णय क्र. टिईडी-२००९/(३३६/०९)/तांशि-५, दिनांक १५/०७/२००९.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र व थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका तसेच अल्पमुदत (Non-AICTE) अभ्यासक्रमाच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या तपासणीबाबतचा कार्यक्रमाचे वेळापत्रक संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये आपणास कळविण्यात आले होते. परंतू अजूनपर्यंत बऱ्याच संस्थांनी या कार्यालयात आपल्या संस्थेच्या गुणवत्ता याद्या सादर करुन तपासणी करुन घेतलेली नाही किंवा याद्या तपासणी करतांना आढळलेल्या त्रुटीची पुर्तता केलेली नाही.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या त्रुटी रहित गुणवत्ता याद्या **दिनांक ३०/१२/२०११ ते दिनांक १५/०१/२०१२** पर्यंत प्रमाणित करण्याकरीता या कार्याल्यात सादर कराव्यात किंवा ज्या संस्थेच्या याद्यांमध्ये त्रुटी आढळून आल्या अशा संस्थेनी त्रुटीची पुर्तता करुन याद्या प्रमाणित करुन घ्याव्या. आपल्या मार्फत त्रुटीची पुर्तता न केल्यास किंवा याद्या या कार्यालयास सादर न केल्यास होणाऱ्या विलंबास संस्था जबाबदार राहिल. तसेच विद्यार्थी परिक्षेस बसू शकले नाही किंवा इतर काही अडचणी उद्‌भवल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, तर आपली संस्था त्यास जबाबदार राहिल, याची नोंद घ्यावी.

तसेच संदर्भ ३ वरील शासन निर्णयान्वये संबंधीत मान्यता प्राप्त संस्थाना (विवरण पत्र अ, ब व क मधील) कळविण्यात येते की सदर शासन निर्णयातील अट क्र. १४ प्रमाणे (अभ्यासक्रम व प्रवेश क्षमता / प्रवेश क्षमतेतील बदलांना) संस्थाच्या याद्या प्रमाणित करता येणार नाही, याची नोंद घ्यावी. तेव्हा संस्थाची याकरीता आवश्यक कार्यवाही करावी. यामुळे होणा-या परिणामास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात येते की गुणवता यादी तपासणी करते वेळी काही विद्यार्थ्यांना T.C. चे दुय्यम प्रतिवर प्रवेश देण्यात आला आहे. तथापी याबाबत संस्थांना कळविल्यानंतर काही संस्थाची विद्यार्थ्यांकडून मूळ T.C. घेऊन या कार्यालयात सादर केल्यात. तेव्हा असे निर्देशनास येते की संस्था कोणत्याही प्रकारची चौकशी न करता सरसकट T.C. चे दुय्यम प्रतिवर प्रवेश करतात, जेव्हा संबंधित विद्यार्थ्यांचा मुळ T.C. वर इतरत्र प्रवेश झालेला असतो. अशा प्रकारे नियमबाळ्हय कृत्य करुन शासनास फसवितात. तेव्हा दुय्यक प्रतिवर प्रवेश देण्यात आलेल्या संस्थेच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की त्यांनी सर्व संबंधित विद्यार्थी / पालक यांना मुळ T.C. सादर करण्यास सुचवावे. यानंतर अप्राप्त मुळ T.C. प्रकरणी त्यांनी या कार्यालयात संबंधित विद्यार्थी / पालक यांचे सोबत सहसंचालकांना भेटण्यास यावे.

(प्र.वि. सरोदे)
सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- प्रक्रिया योजक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळी टाकण्याकरीता.

E:\All Letters Manish.doc

Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional